ISSN 2249-894X Impact Factor : 3.1402 (UIF) Volume - 5 | Issue - 9 | June - 2016
Review Of Research

# पश्चिम विदर्भातील सोयाबिन उत्पादक शेतकरी व शेतमजूरांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषणात्मक अध्ययन

प्रा. डॉ. इ. जे. हेलगे[१] , प्रा. प्रशांत संतोष वैराळकर[२]
[१] मार्गदर्शक , जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा.
[२] जगदंबा महाविद्यालय, अचलपूर, अमरावती.



## साराशं

प्रस्तुत संशोधन हे पश्चिम विदर्भातील सोयाबिन उत्पादक शेतकरी व शेतमजूरांच्याप्रश्नाशी निगडीत आहे भारत हा कृषीप्रधान देश आहे. जास्तीत जास्त लोकांचे जीवन शेती व्यवसायाशी निगडीत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा हा शेती उत्पादनाशी संबंधीत आहे. त्यामुळे हवामानानुसार शेतीत अन्नधान्याचे उत्पादन, उत्पादीत मालाचे वितरण शेतकऱ्यांना मिळणारे उत्पादन मुल्य याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या परिश्रमावरच विशेषत: शेतमालाचे उत्पादन अवलंबून असल्यामुळें शेतकऱ्यांचे जीवनमान त्यांचे सामाजिक प्रश्न, त्यांची आर्थिक समस्या तसेच शेतमालाचे विपणन करतांना येणाऱ्या अडचणी या व्यतिरिक्त शेतकऱ्यासमोर अनेक प्रश्न निर्माण होत असतात. त्या समस्यांचे सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासनाने उचीत सहकार्य देण्याची भुमिका पार पाडली तर पश्चिम विदर्भातील सोयाबिनउत्पादकांना त्याचा निश्चितच फायदा होऊ शकतो.

## प्रस्तावना

भारत हा कृषीप्रधान देश आहे. वर्तमानकाळात शेती व्यवसायाचे महत्व वाढत आहे. भारतीय शेती पूर्णत्वाने निसर्गावर अवलंबून आहे. एका विद्वान व्यक्तीने भारतीय शेतीच्या संदर्भात पूढील विधान केले आहे. "शेती व्यवसाय हा जूगार असून शेतकरी व निसर्ग हे यातील प्रतिस्पर्धी आहेत"शेती हा भारताच्या ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. ग्रामीण भागात शेतीशिवाय उपजीवीकेचे दुसरे साधन नसल्यामूळे बहुसंख्य लोक उपजीवीका करण्यासाठी व रोजगार मिळविण्यासाठी शेतीवर अवलंबून आहेत. त्यामूळे शेतीवर लोकसंख्येचा वाढता दाब निर्माण झाला आहे. त्यातुनच शेतीचे सतत आंतरविभाजन व अपखंडन होवून लहान-लहान आकाराचे तुकडे पडले आहे. म्हणून शेतीतून

अत्यंत कमी उत्पन्न मिळू लागले व शेती करणे परवडनासे झाले आहे. नेत्यांनी महाराष्ट्रासह देशातील शेतकऱ्याच्या मालाचा उत्पादन खर्च व शासनाने ठरवून दिलेल्या शासकीय खर्चातील प्रचंड तफावतीचा अभ्यास केला नाही. त्यामूळे शेतमालाला बाजारात किफायतशीर दर मिळत नाही. शासनाच्या चुकीच्या धोरणामूळे राज्यात शेतकरी होरपडले जात आहेत.

## संशोधनाचे उद्देश

१. पश्चिम विदर्भातील शेतमजूरांचीसामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. पश्चिम विदर्भातील सोयाबिन उत्पादक शेतकरांच्या आर्थीक स्थितीचा अभ्यास करणे.

## पश्चिम विदर्भातील शेतमजूरांचीसामाजीक स्थिती दर्शविणारी माहिती

पश्चिम विदर्भातील ३०० शेतमजूरांचीसामाजीक स्थितीचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये शेतमजूरसामाजीक स्थिती बद्दल किती जागरूक आहे यांचा अंदाज घेण्यात आला. ते पुढील सारणी वरून स्पष्ट होईल.

### सारणी क्रं. १ सामाजीक स्थिती दर्शविणारी सारणी

| अ.क्रं. | विवरण | उत्तरदाते | होय | प्र.प्र. | नाही | प्र.प्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | धार्मिक, राष्ट्रीय सण साजरे केले जातात काय? | ३०० | ३०० | १०० | – | – |
| २ | रक्तदान केलेले आहेत का? | ३०० | ३३ | ११ | २६७ | ८९ |
| ३ | गुन्हेगारी सदरा खाली शिक्षा | ३०० | – | – | ३०० | १०० |
| ४ | भुकंप पुरग्रस्ताना मदत | ३०० | ६० | २० | २४० | ८० |
| ५ | निवडणूकीत भाग घेणे | ३०० | ३५ | ११.६७ | २६५ | ८८.३३ |
| ६ | खेळात सहभाग आहे काय? | ३०० | १४० | ४६.६० | १६० | ५३.३३ |
| ७ | वृक्ष रोपण | ३०० | १३० | ४३.३३ | १७० | ५६.६७ |
| ८ | मुलांना शैक्षणिक सुविधा | ३०० | ३०० | १०० | – | – |
| ९ | संघटीत शेतकरी संघटना | ३०० | १० | ३.३३ | २९० | ९६.६७ |
| १० | राष्ट्रीय एकात्मता | ३०० | ३०० | १०० | – | – |

उपरोक्त सारणी क्रं. १नुसार पश्चिम विदर्भातील शेतमजूरी करणाऱ्या शेतमजूरांच्यासामाजीक स्थितीची माहीती घेण्यात आली असून राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रीय व धार्मीक सण तसेच मुलांना शैक्षणिक सुविधा या संदर्भात शेतमजूरांनी१०० टक्के सकारात्मक उत्तरे दिलेले आहे. तर गुन्हेगारी प्रवृतीत एकही शेतमजूर समाविष्ठ नाही ही आशादायक बाब निर्देशनास आलेली आहे. वृक्षारोपन, भूकूंप व पुरग्रस्ताना मदत याबाबतीत शेतमजूरांच्यासहभाग अल्प होता. ४६.६० टक्के शेतमजूरांनी खेळात सहभाग नोंदविला. तर निवडणूकीत भाग घेणारे शेतमजूरांचेप्रमाणे ११.६७ टक्के होते. एकंदरीत शेतमजूरांचीसामाजीक परिस्थीत समाधान कारक असली तरी सामाजीक जागृतीची त्यांना आवश्यकता असल्याचे निर्देशनास आलेले आहे.

सारणी क्रं. २ सोयाबिन उत्पादीत शेतकऱ्यांचे वार्षीक उत्पन्न दर्शक सारणी

| अ. क्र | जिल्हे | शेतकरी संख्या | १५००० पर्यंत | | १५००१ ते २५००० पर्यंत | | २५००१ पेक्षा जास्त | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | सं. | प्र.प्र. | सं. | प्र.प्र. | सं. | प्र.प्र. |
| १ | अमरावती | ६० | १० | १६.६७ | ३० | ५० | २० | ३३.३३ |
| २ | यवतमाळ | ६० | ५ | ६.३३ | ४० | ६६.६७ | १५ | २५ |
| ३ | अकोला | ६० | ६ | १० | ४२ | ७० | १२ | २० |
| ४ | बुलडाणा | ६० | ८ | १३.३३ | ४० | ६६.६७ | १२ | २० |
| ५ | वाशिम | ६० | ६ | १० | ४० | ६६.६७ | १४ | २३.३३ |
| | **बेरीज** | **३००** | **३५** | **११.६७** | **१९२** | **६४** | **७३** | **२४.३३** |

सोयाबिन उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या आर्थीक वार्षीक उत्पन्नाचा आढावा घेण्यात आला. विविध मार्गाने शेतकऱ्यांचे वार्षीक उत्पन्न किती आहे याची माहीती घेतली असता उपरोक्त सारणी क्रं. २ वरून ३०० शेतकऱ्यापैकी १५००० रूपये पर्यंत वार्षीक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ३५ असुन त्यांचे प्रमाण ११.६७ टक्के आहे. १५००१ ते २५००० पर्यंत वार्षीक उत्पन्न असणारे शेतकरी १९२ असुन त्यांचे प्रमाण ६४ टक्के आहे तर २५००१ पेक्षा जास्त वार्षीक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ७३ असुन त्यांचे प्रमाण २४.३३ आहे.

## निष्कर्ष

राष्ट्रीय एकात्मका लहान मुलांना शैक्षणिक सुविधा या बाबतीत शेतमजूर जागृत झालेले आहेत. तर धार्मीक व राष्ट्रीय सन सुध्दा ते प्रामुख्याने साजरे करतात. वृक्षारोपन तसेच भुकूंप व पुरग्रस्तांना मदत करणारे शेतमजूरांचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे त्यांनी राष्ट्रीय योजनेत सहभागी व्हावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याचे आवश्यकता आहे. संघटनेच्या बाबतीत ग्रामीण भागातील शेतमजूर अजूनही एकत्रीत येवुन लढा देत नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांना संघटीत होणे आवश्यक आहे.

सोयाबिन उत्पादन करणारे शेतकऱ्यांचे वार्षिक आर्थीक उत्पन्न फारच कमी आहे. १५००१ ते २५००१ रूपये आर्थीक उत्पन्न असलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधीक आहे. वर्तमान अवस्थेत शेतकऱ्यांच्या आवश्यक गरजा लक्षात घेता हे उत्पन्न समाधानकारक नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक आर्थीक उत्पन्न प्राप्त करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

## संदर्भ ग्रंथसुची

१. डॉ. आगलावे प्रदिप- संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
२. डॉ. आगलावे प्रदिप, ‘नमुना निवडीचे तंत्र’, सामाजिक संशोधन पद्धती, २००७, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
३. डॉ. भांडारकर- रिसर्च मेथॉडॉलॉजी इन सोशिअल सायंस
४. डॉ. कविमंडन विजय- कृषी अर्थशास्त्र
५. डॉ. बोधनकर, सुधीर, अलोणी विवेक- सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३

६. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन–अमरावती,यवतमाळ,अकोला,बुलडाणा व वाशिम
७. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, अमरावती,यवतमाळ,अकोला,बुलडाणा व वाशिम
८. जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख, अमरावती,यवतमाळ,अकोला,बुलडाणा व वाशिम
९. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रूग्णालय अमरावती, यवतमाळ, अकोला,बुलडाणा व वाशिम
१०.जिल्हा ऋतु व पिके अहवाल–वार्षिक अहवाल २००४ते २०१४
११.पशुगणना–२००१ आणि २०११
१२.प्रत्यक्ष शेतक–याची मुलाखत, निरीक्षण व चर्चा